**<u>वादी तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**<u>अधिकचा सरतपास शपथेवर वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस.व्ही.प्रभू यांचे मार्फत.</u>**

१४. मला आता नि.क्र. ४२/१ वरील खरेदीपत्र दाखविण्यात आले. खरेदीखत लिहून देणार म्हणून भिवा उर्फ नामदेव पुनाजी सावंत यांची सही आहे. खरेदीखत लिहून घेणार म्हणून माझी वडील गोविंद धाकू सावंत यांची सही आहे. त्यावर साक्षीदार म्हणून पुंडलिक शंकर राणे व भाऊ शिवाजी रावराणे यांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र. ९६</u>** दिली आहे. मला आता नि.क्र. ४२/२ वरील दस्त दाखविण्यात आला. त्यावर विजयाबाई नामदेव सावंत यांची सही आहे. तसेच त्यावर ॲडव्होकेट दत्तात्रय करंदीकर यांची सही आहे. नोटरी म्हणून ॲड. वसंत मोरे यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र. ९७</u>** दिली आहे. मला आता नि.क्र. ४२/८ वरील दस्त दाखविण्यात आला. सदरचे पत्र मला बीएसएनएल ऑफिसकडून प्राप्त झाले होते. त्यावर सहाय्यक महाप्रबंधक यांची सही आहे. त्यास **<u>नि.क्र. ९८</u>** दिली आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ तर्फे विधीज्ञ श्री. एस.एस.गवाणकर यांच्या मार्फत</u>**

१५. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत न्यायालयामध्ये मी प्रतिवादींविरुध्द प्रस्तुत दावा मिळकतीबाबत नियमिती दिवाणी दावा क्र. १०/२००० दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, <u>नि. क्र.९६</u> वरील खरेदीखतावर आधारीत वरील नमूद दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, नियमित दिवाणी दावा क्र. १०/२००० मध्ये खरेदीखताच्या आधारे मी मालक झालो आहे अशी घोषणा मागितली नव्हती. मी वरील दाव्यामध्ये वरीलप्रमाणे घोषणा मागितली होती ही बाब दर्शविण्यासाठी कागदोपत्री पुरावा सादर करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दिवाणी दावा क्र. १०/२००० दाखल करताना वरील प्रमाणे घोषणा मागण्याची माझी इच्छा होती. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दिवाणी दावा क्र. १०/२०००

मध्ये प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ने माझा दावा मिळकतीचा मालकी हक्क नाकारलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दिवाणी दावा क्र. १०/२००० मध्ये न्यायालयाने मी मागितल्याप्रमाणे ताकीद नाकारली होती. मी नियमित दिवाणी दावा क्र. १०/२००० मधील न्यायनिर्णय पुर्ण वाचला होता. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दिवाणी दावा क्र. १०/२००० मध्ये मी ताबा सिध्द करु शकलो नाही असे न्यायालयाने मानले होते त्यामुळे सदरचा दावा नामंजूर केला होता. हे म्हणणे खरे नाही की, नियमित दिवाणी दावा क्र. १०/२००० मध्ये न्यायालयाने दावा मिळकतीवरती प्रतिवादी क्र. १ याचा ताबा व वहिवाट असल्याचे मानले होते. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दिवाणी दावा क्र. १०/२००० च्या निकालाविरुध्द जिल्हा न्यायालयामध्ये नियमित दिवाणी अपिल क्र. ३०/२००९ दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेले सदरचे अपिल जिल्हा न्यायालयाने फेटाळले होते. हे म्हणणे खरे आहे की, जिल्हा न्यायाालयाच्या निकालाविरुध्द मी मा. उच्च न्यायालयामध्ये नियमित दिवाणी दुसरे अपिल क्र. ८५३/२०१२ दाखल केले होते. मला इंग्रजी थोडेबहूत समजते. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपिलामध्ये मा. उच्च न्यायालयाने प्रतिवादी क्र. १ याचा वाद मिळकतीवरती ताबा असल्याचे मान्य केले होते. हे म्हणणे खरे आहे की, मा.मुंबई उच्च न्यायालयाने माझे अपिल फेटाळले होते. हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यापासून ते मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या अपिलापर्यंत माझे असे म्हणणे होते की, दावा मिळकतीवरती माझा मालकी हक्क घोषित करण्यात यावा व दावा मिळकतीचा ताबा मला देण्यात यावा व प्रतिवादी क्र.१ यांना दावा मिळकतीतून निष्कासीत करण्यात यावे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वकीलांनी मला असा सल्ला दिला होता की, दावा मिळकतीवरती आपला ताबा आहे असे म्हणून ताकीद मागायची. असे घडलेले नाही की, नियमित दिवाणी दावा क्र. १०/२००० च्या निकालानंतर ते आजरोजीपर्यंत मी प्रतिवादी क्र. १ कडून दावा मिळकतीचा ताबा दांडगाईने काढून घेतला. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ने नियमित दिवाणी दावा क्र. १०/२००० च्या निकालानंतर ते आजरोजीपर्यंत दावा मिळकतीचा ताबा मला रितसरपणे दिला असे कधीही घडलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दाव्यामध्ये मी परत एकदा दावा मिळकतीचा ताबा मिळावा यासाठी मागणी केलेली

आहे. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दावा क्र. १०/२००० मध्ये दावा मिळकतीच्या ताब्याची मागणी करणे शक्य होते. हे म्हणणे खरे नाही की, कब्जाचा दावा दाखल केल्यास उशिर लागू शकतो यासाठी मी केवळ वरील दाव्यामध्ये ताकीदीची मागणी केली होती.

१६. याबाबत मला माहिती आहे की, न्यायालयामध्ये येताना स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आले पाहिजे. हे म्हणणे खरे आहे की, मला नियमित दिवाणी दावा क्र. १०/२००० मधील माझ्या जबानीची प्रत प्रस्तुत दाव्यामध्ये दाखल करण्यास कुठलीही अडचण नव्हती. माझी वरीलदाव्यामध्ये जबानीची प्रत मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. मला आता यादी नि.क्र. १०० वरील दस्त दाखविण्यात आला. सदरची जबानी ही माझीच आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यातील सर्व मजकूर मी सांगितल्याप्रमाणे आहे. त्यास **<u>नि.क्र. १०१</u>** दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दिवाणी दावा क्र. १०/२००० मध्ये मी सन १९२० सालातील खरेदीखत सादर केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे खरेदीखत भिवा पुनाजी सावंत, ज्ञानोबा पुनाजी सावंत व कृष्णाराव सिताराम प्रभुदेसाई यांच्यामध्ये झालेले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर खरेदीखताचे भाषांतर सुध्दा सदर दाव्यामध्ये दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, वरील नमूद १९२० सालातील खरेदीखत हे मोडी भाषेमध्ये होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर १९२० सालातील खरेदीखत हे नोंदणीकृत होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतामध्ये नमूद असलेल्या मिळकती माझ्याकडे दुसऱ्या खरेदीखताव्दारे माझ्याकडे आल्या होत्या असे माझे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९२० च्या खरेदीखतामध्ये खरेदीखतामध्ये नमूद असलेल्या मिळकतीचा ताबा वेंगुर्लेकर नावाच्या व्यक्तीकडे होता असे त्यात नमूद होते. हे म्हणणे खरे आहे की, मी <u>नि.१०१</u> वरील माझ्या जबानीमध्ये नमूद असलेल्या मिळकतीचा ताबा वेंगुर्लेकर नावाच्या गृहस्थाकडे आहे असे मी मान्य केले होते. हे म्हणणे खरे नाही की, नि. ९६ च्या खरेदीखताच्या अगोदर त्यातील मिळकतीचा ताबा वेंगुर्लेकर नावाच्या गृहस्थाकडून भिवा पुनाजी सावंत, ज्ञानोबा पुनाजी सावंत व कृष्णराव सिताराम प्रभुदेसाई यांच्याकडे आला होता ही बाब दर्शविण्यासाठी माझ्याकडे कुठलाही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला सदरचा कागदोपत्री

पुरावा प्रस्तुत दाव्यामध्ये व नियमित दिवाणी दवा क्र. १०/२००० मध्ये दाखल करण्यास कुठलीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे कुठलाही कागदोपत्री पुरावा नसल्यामुळे सदरचा कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. माझा जन्म सन १९५१ साली झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ९६ खरेदीखतावरील सहया खरेदीखत होताना प्रत्यक्षपणे पाहण्याचा कधीही योग आला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ९६ वरील खरेदीखतावरती ज्यांनी सहया केलेल्या आहेत त्यांच्या सहया कशा होत्या ही बाब दर्शविण्यासाठी मी कुठलाही पुरावा प्रस्तुत दाव्यामध्ये सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ९६ वरील खरेदीखत हे माझ्या घरामध्ये होते त्यामुळे त्यावरील सहया वरील नमूद लोकांच्या आहेत असे मी सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ९६ वरील सहया हया त्यावर नमूद असलेले लोक प्रत्यक्षपणे कसे करत होते हे मला पाहण्याचा योग आलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ९६ वरील सहया मी ओळखतो ही बाब मी ऐकीव माहितीच्या आधारे सांगितलेली आहे. याबाबत मला माहित नाही की, पुर्वीच्या काळामध्ये खरेदीखत लिहून देणाऱ्याचीच केवळ खरेदीखतावरती सही केली जात होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे माझे वडील मराठीमधून सही करत होते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ९६ वरील खरेदीखतावरती, खरेदीखत लिहून घेणार म्हणून माझ्या वडीलाची सही नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की, खरेदीखताचा स्टॅम्प विकत घेतल्याबाबत सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ९६ खरेदीखतामध्ये त्यातील मिळकतीचा ताबा माझे वडील गोविंद सावंत यांना मिळाल्याबाबत त्यावर त्यांची सही नाही.

१७. हे म्हणणे खरे आहे की,नि.क्र. ९६ वरील खरेदीखतामध्ये स.नं. १०२ हि.क्र. १ हा नमूद केलेला नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, पोट फाळणी क्रमांक नमूद केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, कुठल्या पोटफाळणीतून कुठला हिस्सा तयार झाला हे बोटखताच्या व्दारे सिध्द होते. साक्षीदार पुन्हाहून सांगतो की, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, कुठल्या पोट फाळणीतून कुठला स.नंबर व हिस्सा नंबर तयार झाला ही बाब दर्शविण्यासाठी मी प्रस्तुत दाव्यामध्ये आकारफोड पत्रक व बोटखत दाखल केलेले नाही.

याबाबत मला माहिती नाही की, १९२० च्या खरेदीखतामध्ये स.न. १०२ हि.क्र. १ याचे वर्णन दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मला सन १९२० चे खरेदीखत प्रस्तुत दाव्यामध्ये दाखल करण्यास कुठलीही अडचण नव्हती.

१८. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रस्तुतचा दावा दाखल करण्याचा कुठलाही कायदेशीर अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा मालकी हक्क, कुठल्याही खरेदीखताच्या आधारे माझ्याकडे आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ याला पुन्हा पुन्हा त्रास देण्यासाठी खोटा दावा दाखल केलेला आहे. हे मला आठवत नाही की, मी नि.दि.दावा क्र. १०/२००० मध्ये प्रतिवादी क्र. १ याचे दि. ०८/०६/१९८७ चे खरेदीखत रद्द करण्यासाठी कुठलीही मागणी केली नव्हती. मी नियमित दिवाणी दावा क्र. १०/२००० च्या दाव्याची प्रत व मालवण दिवाणी न्यायालयाने पारीत केलेल्या हुकूमनाम्याची प्रत प्रस्तुत दाव्यामध्ये हजर करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, मला प्रतिवदी क्र. १ च्या खरेदीखताबाबत सर्वप्रथमतः माहिती सन १९९०–९१ मध्ये मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला सदर वेळीसुध्दा प्रतिवादीचे खरेदीखत बेकायदेशीर आहे असे वाटत होते. हे मला आठवत नाही की, सन १९९०–९१ पासून ते प्रस्तूत दावा दाखल करेपर्यंत मी प्रतिवादी क्र. १ चे खरेदीखत रद्द करुन मागितलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९०–९१ पासून ते प्रस्तुतचा दावा दाखल करेपर्यंत कुठल्याही सक्षम न्यायालयाने प्रतिवादी क्र. १ चे खरेदीखत रद्द केले असे काही घडलेले नाही. साक्षीदार पुन्हाहुन सांगतो की, याबाबत मला माहिती नाही. हे मी सांगू शकत नाही की, मला कुठल्या साालापासून आठवत नाही.

मध्यान्ह सुट्टी झाल्यामुळे उलट तपास मध्यान्ह सुट्टीपर्यंत तहकूब करण्यात येतो.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : १९/११/२०२४

महेश रा. देवकते
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण.

मध्यान्ह सुट्टी नंतर उलट तपास शपथेवर सुरु.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ तर्फे विधीज्ञ श्री. एस.एस.गवाणकर यांच्या मार्फत</u>**

१९. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ९६ च्या दस्ताचा अंमल दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याला झालेला नाही. मला दावा मिळकतीच्या ७/१२ व इतर कागदपत्रे याबाबतची माहिती माझ्या वयाच्या ४० ते ४५ वर्षापासून झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वयाच्या ४० व्या वर्षी दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यास नाव नोंदविले गेले नसल्याचे मला माहित झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ला मिळकत विकत देणारे विजयाबाई नामदेव सावंत यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याला असल्याची बाब मला माहित होती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याला विजयाबाई नामदेव सावंत याचे नाव मालक म्हणून नोंदविले गेले होते. मला आता <u>नि.क्र. ४४</u> वरील ७/१२ उतारा दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ४४ वरील ७/१२ उताऱ्याला सन १९५७–५८ पासून विजयाबाई नामदेव सावंत याचे नावाची नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, विजयाबाई नामदेव सावंत ही नामदेव पुनाजी सावंत यांची वारस आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी अथवा माझे पुर्वाधिकारी दावा मिळकतीचे कुळ आहोत असे माझे म्हणणे नाही. हे म्हणणे खरे नाही की, कुठल्याही कायदेशीर खरेदीखताव्दारे दावा मिळकत माझ्याकडे आलेली नाही. हे मी निश्चित सांगू शकत नाही की, मला प्रस्तुत दाव्यामध्ये दावा मिळकतीच्या चतुःसिमा नमूद करणे शक्य होते. हे म्हणणे खरे नाही की, मला दावा दाखल करताना दावा मिळकतीच्या चतुःसिमा माहित नसल्यामुळे मी दाव्यामध्ये दावा मिळकतीच्या चतुःसिमा नमूद केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यामध्ये चतुःसिमा नमूद केल्या असत्या तर सव्हे क्रमांकात नमूद केलेली मिळकत ही चतुःसिमेतील नाही हे न्यायालयाच्या निदर्शनास आले असते त्यामुळे मी चतुःसिमा नमूद केलेल्या नाहीत.

२०. दावा मिळकतीच्या जमिनीचा आजरोजीचा गुठयांचा भाव ५ ते ७ हजार रुपये गुंठा सुरु आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१३ मध्ये सुध्दा दावा जमिनीचा गुठयांचा भाव

५ ते ७ हजार रुपये होता. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१३ साली दावा मिळकतीचा दर हा १२ लाख रुपये होता. याबाबत मला माहिती नाही की, मी दाव्यामध्ये दावा जमिनीची रु. ३५,०००/– दाखविलेली किंमत चुकीची आहे. मी प्रतिवादी क्र. १ ने दाखल केलेली लेखी कैफियत वाचलेली आहे. हे मला आठवत नाही की, प्रतिवादी क्र. १ ने लेखी कैफियतीमध्ये दाव्याचे मुल्यांकन योग्य केले नसल्याचे कथन केले होते. हे मी सांगू शकत नाही की, मी दाव्याचे योग्य मुल्यांकन केले असते तर प्रस्तुतचा दावा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रामध्ये आला नसता. याबाबत मला माहिती नाही की, ज्या ठिकाणी मिळकत स्थित आहे त्या ठिकाणच्या सब रजिष्ट्रार ऑफिसमध्ये मिळकतीबाबत नोंदणी केली जाते. हे मी निश्चित सांगू शकत नाही की, नि.क्र. ९६ वरील खरेदीखत हे मालवण सब रजिष्ट्रार कार्यालयामध्ये नोंदविले गेलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ९६ वरील खरेदीखत नेमके कोठे नोंदविले गेले आहे याबाबत मला माहिती नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मुंबई येथे नोंदविले गेलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुंबई सब रजिष्ट्रार ऑफिसला मालवण येथे स्थित असलेल्या मिळकतीचे खरेदीखत नोंदवून घेण्याचा अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ९६ वरील खरेदीखताचा दावा मिळकतीशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन १९२० च्या खरेदीखताचा व दावा मिळकतीचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटे सरतपासाचे शपथपत्र दिले आहे व खोटी साक्ष दिलेली आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : १९/११/२०२४

महेश रा. देवकते
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण.